Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- XII ISSUE- II FEBRUARY 2025 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.379 ISSN 2349-638x

# 1990 नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीतील जातवास्तवाचा अभ्यास

श्री.सचिन गालफाडे
संशोधक विद्यार्थी

**प्रस्तावना**

भारत देशात प्रत्येक व्यक्तीच्या जन्माबरोबर त्याला एक जात चिकटते. ही जात त्याच्यात अहंगंड अथवा न्यूनगंड तयार करीत असते. जातीने घालून दिलेल्या नीतिनियमांप्रमाणेच त्याचे पालनपोषण केले जाते. ही जात त्याच्या आयुष्याच्या अखेरपर्यंत त्याची सोबत करते. नामसंस्कारापासून ते अंत्यसंस्कारापर्यंत सर्वकाही विधी, उपचार इत्यादी जातसंमत पध्दतीनेच केले जातात. म्हणूनच जी कधीच जात नसते, तीच जात असते, असे म्हणावेसे वाटते. जातीजातीत विभागलेला समाज त्यामुळेच एकसंध उभा राहण्यास कचरतो. अथवा तो एकसंध होऊ नये, याची पुरेपूर काळजी व्यवस्थेकडून घेतली जाते. व्यवस्था चालविणारेच आपले हितसंबंध, लाभ, श्रेष्ठत्व, प्रतिष्ठा इत्यादींना बाधा पोहोचणार नाही, अशाच पध्दतीने व्यवस्था हाकत असतात.

जातीअंतासाठी महाराष्ट्रात प्रामुख्याने महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगेबाबा, कर्मवीर भाऊराव पाटील, अण्णाभाऊ साठे, महर्षी वि. रा. शिंदे, सानेगुरुजी, बाबा आढाव इत्यादी अनेक समाजसुधारकांनी मोलाचे प्रयत्न केल्याचे दिसून येते. या समाजसुधारकांच्या कार्यामुळेच महाराष्ट्राच्या समाजमनाची मशागत झाली. या मशागतीमुळेच पुढे महाराष्ट्राची ओळख देशभरात पुरोगामी महाराष्ट्र अशी झाली.

1990 नंतर देशाने किंबहुना जगाने जागतिकीकरणाचा स्वीकार केला. खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाचा मोठा प्रभाव सर्वच क्षेत्रांवर झाला. याला साहित्य क्षेत्रही अपवाद नाही. समाजाची मूल्यव्यवस्था हळूहळू बदलू लागली. प्रेम, विश्वास, आपुलकी, जिव्हाळा, नातेसंबंध, माणुसकी इत्यादी घटकांना पैशाच्या बाजारात कोणतेच मूल्य उरले नाही. पैसा हेच सर्वश्रेष्ठ मूल्य म्हणून स्थापित होऊ लागले. अशाही परिस्थितीत जातीचा सैतान खेडोपाडी थैमान घालतच होता.

**उद्दिष्टे**

1)परखडपणे जातवास्तवाचे चित्रण करणाऱ्या साहित्यिकांची नोंद घेणे.
2)परखडपणे जातवास्तवाचे चित्रण करणाऱ्या साहित्यकृतींची नोंद घेणे.
3) जातवास्तवाच्या उदाहरणांचा परामर्श घेणे.

**स्पष्टीकरण**

1990 नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीत परखडपणे जातवास्तवाचे चित्रण करणारे काही साहित्यिक व त्यांच्या साहित्यकृती पुढीलप्रमाणे सांगता येतील. राजन गवस [ ब बळीचा ] , महेंद्र कदम [ आगळ ] , गणेश आवटे [ भिरुड ], आसाराम लोमटे [ तसनस] , भालचंद्र नेमाडे [ हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ ] , शेषराव मोहिते [ असं जगणं तोलाचं ] , रवींद्र शोभणे [ कोंडी ] , रंगनाथ पाटील [ सात पाटील कुलवृत्तांत ] , नवनाथ गोरे [ फेसाटी ] , भारत काळे [ ऐसे कुणबी भूपाळ ] , सरदार जाधव [ कोयता ] , कृष्णा खोत [ गावठाण ] इत्यादी.

आजच्या काळातही सवर्णांच्या मन आणि मेंदूमधून दलितांविषयीचा द्वेष कमी झाल्याचे आढळून येत नाही. दलित हे कायम त्यांच्या पायाशी असावेत, असे त्यांना वाटते. दलितांनी उच्च शिक्षण घेतल्यामुळे, त्यांचे राहणीमान, पोशाख इत्यादी सुधारल्यामुळे, दलितांनी गावात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केल्यामुळे, दलितांनी मोबाईलवर डा◌ॅ.बाबासाहेब आंबेडकर यांची रिंगटोन ठेवल्यामुळे, सवर्ण मुलीवर प्रेम केल्यामुळे, आंतरजातीय विवाह केल्यामुळे, गावात चांगले घर वा बंगला बांधल्यामुळे, नव्या दुचाकी वा चारचाकी वाहनातून फिरत असल्यामुळे, अंगावर दागदागिने- सोनेनाणे घातल्यामुळे, सवर्णांकडून

होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडल्याबद्दल, गाव पातळीवरील राजकारणावरुन दलितांना नेहमीच लक्ष्य करण्यात येत होते व लक्ष्य करण्यात येत आहे. यात प्रामुख्याने दलितांची आर्थिक कोंडी करणे, छळ करणे, मारहाण करणे, प्रसंगी निर्घृण खून करण्यापर्यंत येथील धनदांडग्या उच्चवर्णियांची मजल गेलेली आपणास आज पहावयास मिळते. अशी अनेक प्रकरणे उजेडातही येत नाहीत. जी प्रकरणे उजेडात आली, त्यावर व्यवस्थेकडून तत्परतेने पीडितांना न्याय मिळत नाही. जणूकाही संपूर्ण व्यवस्थाच गुन्हेगारांना पाठीशी घालण्यासाठी काम करते आहे, असे वाटते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे या दीन दलितांचे प्रेरणास्थान आहे, उर्जास्त्रोत आहे, लढाऊ बाण्याचे केंद्र आहे. त्यामुळेच हे दीन दलित अल्प शिक्षण, अल्प बळ, अल्प धनसंपत्ती असूनही अन्यायाच्या विरोधात प्राणपणाने लढा देताना दिसतात.

**निष्कर्ष**

1) एकविसाव्या शतकातही जात संपलेली नाही.
2) जातीय अस्मिता अधिकच टोकदार होत चालल्या आहेत.
3) दलितांवरील अन्याय अत्याचारांची मालिका अखंडित सुरु आहे.
4) जाती व धर्मात समाज विखुरलेला आहे.

**समारोप**

आजच्या काळात शिक्षण, रोजगार, आरोग्य, महागाई इत्यादी विषय देशभरात चर्चेच्या केंद्रस्थानी असणे अपेक्षित होते. परंतु सध्या देशात आरक्षणाच्या मुद्दय़ावरून अनेक जाती व जातीसमूह एकमेकांविरोधात उभे राहिल्याचे पहावयास मिळते. आपल्या राजकीय स्वार्थासाठी, मतांच्या ध्रुवीकरणासाठी धर्माधर्मांत तेढ निर्माण होईल असे वातावरण जाणीवपूर्वक तयार करण्यात येत आहे. आजच्या जातवास्तवाबद्दल लेखक प्र. ई. सोनकांबळे म्हणतात, " आमच्या काळात शिवू ( स्पर्श ) देत नव्हते, मात्र जगू देत होते. आता शिवू देतात, मात्र जगू देत नाहीत. "

**संदर्भ**

1) संपा. प्राचार्य डॉ.जाधव गजानन - नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी - अनघादित्य प्रकाशन ( परतवाडा ) अमरावती - प्र. आ. 15 ऑक्टोबर 2021 ( विजयादशमी ) .
2) डॉ. घोलप दत्ता - ग्रामीण कादंबरी प्रारंभ ते 1947 ( लेख ) उद्धृत ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास - संपा. काळुंखे रामचंद्र - कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद - प्र. आ. जुलै 2016 .
3) आवटे गणेश - भिरुड - पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि. महालक्ष्मी चेंबर्स, भुलाभाई देसाई रोड, मुंबई 20 - प्र. आ. 2007